# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.06.2025** **वार-गुरुवार**

---

**विमान अपघात**

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं एक प्रवासी विमान आज रहिवासी भागात कोसळलं; अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं असून बचावकार्य सुरू आहे. या अपघातात मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याची भीती व्यक्त होत आहे. हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होतं, आणि त्यात प्रवासी आणि कर्मचारी असे एकंदर 242 जण होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे तसंच नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

मंत्री राममोहन नायडू आणि आपण स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहोत, विमान वाहतूक आणि आपत्कालीन प्रतिसाद दलांना आवश्यक निर्देश दिले असून बचाव पथकं तैनात करण्यात आली असल्याचं मुरलीधर मोहोळ यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सर्व प्रवाशांच्या सुरक्षितेबाबत त्यांनी प्रार्थना केली आहे.

**अमितेश कुमार**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शाळा आणि विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बस चालकांनी बस नियमावलीचं काटेकोर पालन करावं, असे निर्देश पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल दिले. पोलीस आयुक्तालयात आयोजित, शालेय विद्यार्थी वाहतूक जिल्हा सुरक्षितता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. विद्यार्थ्यांची ने-आण करणारी बस आणि इतर वाहनात सीसीटीव्ही लावणं अनिवार्य करावं, शाळेच्या बसमध्ये 6 वर्षाखालील मुलांना ने-आण करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, वाहनचालक, वाहक, क्लीनर आदींची पोलीस पडताळणी करुन घ्यावी, बसचा चालक प्रशिक्षित आहे का याचीही खात्री शालेय परिवहन समितीनं करावी असे निर्देश अमितेश कुमार यांनी दिले. खाजगी वाहनातून शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबवावी. नियमांचं उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी, स्कूल बसचे अपघात रोखण्यासाठी शाळा, परिवहन विभाग, पोलीस विभाग यांच्यामध्ये समन्वय असावा, असंही अमितेश कुमार म्हणाले.

**पुल**

महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु ल देशपांडे यांचा आज 25वा स्मृतीदिन आहे. आपल्या खुमासदार विनोदी लेखनातून वाचकांना दिलखुलास हसायला लावणारे, आपल्या संगीतातून रासिकांवर मोहिनी घालणारे आणि अनेक सामाजिक कार्यांना पाठबळ देणारे पु ल देशपांडे यांच्या नावाचं गारुड आज नव्या पिढीवरही तितकंचं आहे. पुलंना अभिवादन करण्यासाठी आज पुण्यात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुलंच्या पुस्तकांचं अभिवाचन, त्यांच्या नाटकांचं, गाण्याचं सादरीकरण, त्यांच्या लेखन कार्यावर आणि एकूणच व्यक्तिमत्त्वावर आधारित परिसंवाद अशा विविध माध्यमातून पुलंचं स्मरण केलं जात आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी उपायुक्तांच्या पदभारात बदल केले आहेत. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त पदाची जबाबदारी प्रसाद काटकर यांच्याकडे देण्यात आली आहे. काटकर यांच्याकडे निवडणूक विभाग तसंच विधिमंडळ कामकाज समन्वयाची जबाबदारी देखील असणार आहे. प्रशांत ठोंबरे यांच्याकडे असलेला आकाशचिन्ह विभागाचा पदभार काढून त्यांच्याकडे परिमंडळ चार आणि दक्षता विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. सोमनाथ बनकर यांच्याकडे सुरक्षा, झोपडपट्टी निर्मूलन पुनर्वसन, आणि महापालिका वसाहती व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**पिंपरी चिंचवड महापालिका**

पिंपरी चिंचवड महापालिकेत शासकीय कामानिमित्त नागरिक अनेकदा अधिकाऱ्यांच्या भेटीसाठी येत असतात. या भेटीसाठी महापालिकेने निश्चित वेळ निर्धारित केली आहे. मात्र या वेळेत अधिकारी जागेवर नसल्याच्या तक्रारी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागानं भरारी पथकाची नेमणूक केली आहे.

**प्राचार्य**

डॉ. श्याम मुडे यांची डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे अठरावे प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून भूगर्भशास्त्र या विषयात पी. एचडी. पदवी संपादन केली आहे.

**डीएपीखत**

खरीप हंगामामध्ये डीएपी म्हणजे डाय-अमोनियम फॉस्फेट खताच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांना सिंगल सुपर फॉस्फेट म्हणजे एसएसपी, ट्रिपल सुपर फॉस्फेट म्हणजे टिएसपी आणि एनपीके या पर्यायी खतांचा वापर करावा असं आवाहन पुणे कृषी विभागानं केलं आहे. पर्यायी खतांच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि पर्यावरण संरक्षणालाही हातभार लावतो, तसंच पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते अस पुणे जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी सांगितलं.

**आंदोलन**

गुलटेकडी परिसरातील गंगाधाम चौकात सतत अपघात होत असतानाही पुणे महापालिका तिथे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक आघाडीनं केला आहे. या विरोधात पक्षाच्या वतीनं आज महापालिकेत आंदोलन करण्यात आलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं; कमाल 30 पूर्णांक 7 आणि किमान 23 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्याही दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**